विश्वचि दिसेल। चंद्र सूर्य तारांगणें सकल। आकाश वायू तेज जल। पृथ्वीही दिसेल ठायींच ॥ ९५ ॥ होईल सर्व देवांचें दर्शन। आनंदून जाईल मन। परीं मीच हें सर्व रूपें भरून। आहे हें जाणून संतोषावें ॥ ९६ ॥ चराचरीं तूंचि भरलासी। असों दे हें सर्वदा मानसीं। पंचभूतांचें शरीर तूं नव्हेसी। असशी तूं सच्चिदानंद रूप ॥ ९७ ॥ स्वस्वरुपीं सदा रंगूनीं। असावें त्वा दिनरजनी। संसार शिसारीं नसावी मनीं। आत्मानुसंधानीं रत व्हावें ॥९८॥ अर्थ सांगोनि महावाक्याचा। श्रेष्ठ योगी सांगती भक्तिचा। पंचकोष विवरणाचा। उपाय साधा सांगती ॥ ९९ ॥ अंतःकरण चतुष्टय। त्याचा साक्षी तूंच होय। ब्रह्मानंदी करुनि सोय। सर्व उपाय सांगती ॥ १०० ॥ सर्वांसूतीं आत्माच भरला। ऐसें सांगोनि त्यांजला। पटवोनि त्यांच्या मनाला। आशिर्वादिला शिष्य तेव्हां ॥ १०१ ॥ ऐकुनि सद्गुरुचें अमृत वचन। शिष्यासि झाला आनंद पूर्ण। देवोनि क्षेमालिंगन। अंतर्धान झाले सग्दुरु ॥ १०२ ॥ सग्दुरु न दिसती म्हणून। गहिंवरलें सोहिरोबांचें मन। तरी विचार बळें करून। समाधान पावती ॥१०३॥ जैसा कर्पूर दीप संयोग। तैसेंच सोहिरोबांचें वैराग्य। टाकिले सर्व विषय भोग। नर जन्मींचें भाग्य उदेलें ॥ १०४॥ विसरले जाणें वाडीचें। की सरकारी नोकरीचें। हृदयीं भरलें रूप सग्दुरुचें। कशाचेंच भान नाहीं ॥१०५॥ ह्यांसी कळलें समग्र। की हे गैनीनाथ थोर। निवृत्ति नाथांचे गुरुवर। भेटले अपार पुण्यबळें ॥१०६॥ यांचे खरे अवतार चरित्र। विस्मय कारक असे सुंदर। श्रवण करितां आश्चर्य फार। गुरु कृपा थोर कळों येत ॥१०७॥ कोण एकेकाळीं मच्छेंद्रनाथें। संजीवनी मंत्र दिधला गोरक्षातें। वृक्षातळीं जपत होते। तो तेथें पोरें धनगराचीं आलीं ॥ १०८ ॥ हातीं मेणमाती घेऊन। बाहुली बनविती पोरें लहान। तों देखिलें गोरक्षां लागून। आलीं धाऊन मुलें सर्व ॥ १०९ ॥ त्यां जवळीं येवोनियां। सांगती बाहुली बनवावया। ऐकोनि मुलांच्या वचनें या। गोरक्ष योगी संतुष्ट झाला ॥ ११० ॥ जेवीं प्रिय असती सुगंधित फुलें। तेवींच संतांसी प्रियकर मुलें। संतांचेंअंतःकरण खुलें। निर्विकारी मुलें पहातां ॥१११॥ गोरक्षनाथ बाहुली बनवित। मुखें संजीवनी मंत्र जपत। पूर्ण बाहुली होतां तेथ। अद्भुत चमत्कार झाला पैं॥ ११२ ॥ मंत्रमाहात्म्य असें महान। बाहुलींत प्रगटलें चैतन्य। पळालीं पोरें भिऊन। भुत म्हणून ओरडती ॥११३॥ कळला जनां समाचार। येती ग्रामींचे नारीनर। आले सग्दुरु मच्छेंद्र गलबला थोर एकोनी ॥११४॥ बालकासि घेवोनि मच्छेंद्र हातीं। गैबी ऐसें नाम ठेविती। आपुल्या पुण्याश्रमींनेती। देती दूध बालकासी ॥११५॥ पुत्राचें पालन पोषण। करणें त्रासाचें काम जाणून। सांगती ग्रामींचे जन। टाका देऊन पोसण्यासी ॥११६॥ त्या ग्रामीं मधुनामें ब्राह्मण। निपुत्रिक होता जाण। त्यासी देती तें पुत्ररत्न। पोषण करण्या कारणें ॥ १७॥ पति पत्नीसी सतोष अपार। कीं मिळाला पुत्र सुंदर। पाळुनि पुत्र झाला थोर। तों मच्छेंद्र येती न्यावया ॥११८॥ नेलें पुत्रासी आपुल्या घरीं। मंत्रोपदेश दिधला त्यासी। पावला भक्तिज्ञान वैराग्यासी। जैसे कां यतिशुकयोगी ॥११९॥ न माता न पिता त्यांसी। म्हणुनि गैबी नांव ठविलें त्यासी। गहिनीनाथ प्रसिद्ध नामिसी।

निवृत्तीसी हेचि गुरु ॥ १२० ॥ कोणी म्हणेल हे कैसें झालें। निवृत्ति सहाशें वर्षे पहिले। सोहिरोबा दोनशें अलीकडले। हें कैसें घडलें पुसाल ॥ १२१ ॥ षडविकारांचा करीती अंत। त्यांसी जगीं म्हणती संत। संतये गा हे विश्वंभरित व्यापक। हात आत्मा त्यांचा ॥ १२२ ॥ जो त्यांचे करी स्मरण। आणि येई अनन्य शरण। देव प्रगटे त्यांच्या रुपें जाण। थोरपण संतांचें वाढवावया ॥ १२३ ॥ संत महिमा वाढवावया। सिद्ध असे हरीची माया। मूढांच्याही हृदयीं प्रगटूनियां। महिमा गावया लावी संतांचा ॥ १२४ ॥ काय करील नकळे हरी। जो भरोनि उरला चराचरीं। क्षणांत रंकाचा राव करी। रावासि भिकारी करीतसे ॥ १२५ ॥ संत प्रेमाचें देवास वेड। संतांचें सर्व पुरवी तो कोड। कीर्तनाचीच त्यासि आवड। उघडपणें सांगितलें गीतेंत ॥ १२६ ॥ असो गर्भारीनामें पर्वतावरी। त्यांची समाधी असे आजवरी। मुसलमानही भजती निर्धारीं। गैबी पीर म्हणती त्यांसी ॥ १२७ ॥ सद्‌गुरू दर्शनानंतर। सोहिरोबांचे बदलती विचार। राजासि भेटूनि सत्वर। पर सेवेंतुनी मुक्त झाले ॥ १२८ ॥ गुरुकृपा होतां थोर। कवित्व स्फूर्ती आली सत्वर। पदें रचिलीं असती सुंदर। वैराग्य पर आणि ज्ञान भक्तीचीं ॥ १२९ ॥ भगवत् भजनीं सदारत। योगी असूनिही संतभक्त। म्हणुनींच त्यांची योग्यता अत्यंत। श्रेष्ठ होत जाणा हो ॥ १३० ॥ आपण उद्धरुनि जगा उद्धरिती। हीच श्रेष्ठ संतांची रीति। सर्वांभूतीं भगवंत पाहती। देह गेह खंती त्यांसी नाहीं ॥ १३१ ॥ राजेसाहेब खेम सावंत। सन्मानें यांसी दरबारीं नेत। प्रेमभरें चरण धरत। म्हणे मनांत राग धरूं नये ॥ १३२ ॥ आमुचा असेल अपराध घोर। तरी क्षमा करा तुम्हीं संतवर। नवनीतासम तुमचें अंतर। उपकार करा दासावरी ॥ १३३ ॥ ऐकोनी रायाचें करुण वचन। आशीर्वाद देती त्या लागून। म्हणती न्याय निष्ठेनें राज्य चालवून। राखा मान प्रजेचा ॥ १३४ ॥ आणि सांगती आज्ञा वचन। सोहिरोबा संत निधान। सोडा करणें मद्यपान। जेणें प्रजाजन कष्टी होती ॥ १३५ ॥ बांदे गावींच संत राहात। कवित्व सर्वहि तिथेंच रचित, राजाची यांवरी मर्जी बहुत। राजा मानित वचन त्यांचें ॥ १३६ ॥ त्यांची भगिनी असे त्यांचेपाशीं। तीच सर्व लिही त्यांचे स्फूर्तीसी। म्हणुनिच उपलब्ध काव्य आम्हासी। श्रेय सर्वस्वें तिजला असे ॥ १३७ ॥ कागद महाग म्हणून। अनेक पदें पर्णी लिहून। ठेविलीं होतीं जपून। तीं न कळत जाळिलीं मातें ॥ १३८ ॥ यांच्या पद्य संग्रहांमधून। स्पष्ट उपदेशिलें असें तत्त्वज्ञान। आत्मस्वरूपाचा अनुभव जाण। पूर्णपणें रंगविला असे ॥ १३९ ॥ यांचे ग्रंथही अनेक असती। पाहिला ग्रंथ अक्षय बोध नामें रचिती। महदनुभवेश्वरी निश्चितीं। तिसरा रचिती पूर्णाक्षरी ॥ १४० ॥ चवथा अद्वयानंद ग्रंथ। सिद्धांत संहिता पांचवी होत। हे सर्वही महान् ग्रंथ। बांद्यांत असतांच रचिले पैं ॥ १४१ ॥ अक्षय बोध नामें ग्रंथ। रचिला सोळाशें एकाहत्तर शतकांत। रचितां सर्वांसि अनुभव येत। हांत वाचकांसी ज्ञानलाभ ॥ १४२ ॥ समाधीयोग अद्वैतयोग। वैराग्ययोग ज्ञानयोग। सद्विवेक योग विवेक योग। बोध, मुक्त लक्षण योग पैं ॥ १४३ ॥ ह्या आठ विष-

यांचें विवेचन । आठ प्रकरणांत केलें जाण । वाचितां होईल कल्याण । जनन मरण चुकेल ॥ १४४ ॥ जैसी ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी । तैसीच महदनुभवेश्वरी । श्रोतावक्त्यांसी कल्याणकारी । भवसागरीं तरण्यासी ॥ १४५ ॥ बांदें मुक्कामीं असतां त्यांनीं । भक्ति ज्ञान वैराग्य निरूपणीं । अनेकांस लाविलें भजनीं । यात्रेलागोनि निघाले आपण ॥ १४६ ॥ दोन पुत्रांसंगें घेऊन । निघती तीर्थयात्रे लागून । साठवर्षें वय असून । निघाले जाणा तीर्थासी ॥ १४७ ॥ त्यांचि पहिली विधवा सून । तिजला एकचि असे पुत्ररत्न । तो मरणोन्मुख होऊन । पडून राहिलासे अंथरुणीं ॥ १४८ ॥ रडून सुनेनें आकांत केला । म्हणे जाऊं नका हो सोडून मजला । कोण सांभाळिल माझ्या पुत्राला । झाला असे आजारी हा ॥ १४९ ॥ ऐकून तिचें करुण वचन । कळवळलें संतांचें मन । त्याच्या पाठीवरी हात फिरवून । आशीर्वचन देती त्याची ॥ १५० ॥ नेत्र झांकोनी सोहिरोबा । अंतरीं आठविती विठोबा । मायलेकराचें रक्षण करीबा । तुजविण त्राता कोणी नाहीं ॥ १५१ ॥ विठू मी आजपर्यंत । मागितलें न कांहीं तुजप्रत । तरी प्रसंग झाला प्राप्त । आरोग्यवंत करी बालकासी ॥ १५२ ॥ जणूं प्रार्थना ऐकिली विठूनें । आरोग्य बरें केलें त्यानें । स्नुषेनें त्यांसी आनंदानें । यात्रेकारणें निरोप दिधला ॥ १५३ ॥ संतांसी तीर्थयात्रा कारण । जरूरीच नसे जाण । संतचरणची तीर्थ समजून । वंदावें आपण सर्वकाळ ॥ १५४ ॥ पापीजनांच्या संसर्गें करून । तीर्थें मलीन होतीं म्हणून । तीर्थेंच इच्छिती संतचरण । उद्धरण होण्याकारणें ॥ १५५ ॥ उज्जनी हस्तिनापूर काशी । इत्यादि स्थळें पाहोनी त्यांसी । वाटलें जावें ग्वाल्हेरासी । पुत्रांसी घेऊन समवेत ॥ १५६ ॥ शके सत्राशें एकचा सुमार । राजधानी असतां ग्वाल्हेर । महादजी शिंदे सरकार । गादीवर होते जाण ॥ १५७ ॥ त्यांचे पदरीं गोमांतकांतील । केरी गांवचे जिवाजी बल्लाळ । होते सारस्वत ब्राह्मण सुशील । शिंद्यांनीं बहाल केली बक्षिसगिरी ॥ १५८ ॥ पोंचले सोहिरोबा ग्वाल्हेरासी । भेटले जिवबा दादा बक्षी । बक्षिसगिरी मिळाली जिवाजींसी बक्षी नांव ठेविलें शिंद्यानीं॥१५९॥ सोहिरोबा ब्राह्मण गौड सारस्वत । आमुल्याच प्रांतींचे हे संत । म्हणोन त्यांचा सन्मान करीत । तेज दिव्य अत्यंत संतांचें ॥ १६० ॥ तेज देखोनि सोहिरोबांचें । तात्काळ चरण धरित त्यांचे । म्हणती घरीं यावें आमुचे । भाग्यानें संत दर्शन घडलें मज ॥ १६१ ॥ ठेऊन घेतलें सोहिरोबांसी । सत्संगतीनें आनंद मानसीं । कळली खबर सर्वांसी । कीं साधु घरासी आणिले ॥ १६२ ॥ ऐकतां संत आगमन थोर । विचार करिती शिंदे सरकार । म्हणती सन्मानें आणुंया इथवर । संतवर सोहिरोबांसी ॥ १६३ ॥ जिवबा दादांस बोलाविलें । संतासीही आमंत्रण दिधलें । दोघेही यावया निघाले । जिवबा बोलले संतांपाशीं ॥ १६४ ॥ सांगती संतासी सरदार । कीं शिंद्यानीं रचिल्या कविता सुंदर । तुम्हासी दाखवतील जर । तरी कौतुक फार करावें ॥ १६५ ॥ असो दोघे दरबारीं पोंचले । शिंदे स्वत सामोरे आले । कराला धरून आंत नेलें । बैसवूं गेले

सिंहासनावरी ॥ १६६ ॥ आपुली गादी श्रृंगारून । ठेविली असे संताकारण । परि त्यावरी न बैसती जाण । थोर समान भेद नाहीं त्यासी ॥१६७॥ अल्पावकाशांत शांतता पसरून । दरबारीं आनंद गेला भरून । संताचें होतां आगमन । प्रसन्न झालें मन सर्वांचें ॥ १६८ ॥ जणूं शांतीचा चंद्र उगवला । पसरवित अमृत किरणाला । तैसेंच वाटलें सर्वांला । राजालाहि सुख झालें ॥ १६९ ॥ आपुलें कवित्व दाखवूनि त्यांसी । अत्यंत चकित करावं मानसीं । ऐसे धरोनियां गर्वासीं । आपुल्या पोथीसी आणविलें ॥ १७० ॥ पोथी देवोनी संतां करीं । म्हणत कैशा कविता पहा तरी । ऐसें बोलोनीं सत्वरीं । अंतरीं गर्वित महादजी ॥१७१॥ ग्रंथ घेवोनियां हातीं । ऐका सोहिरोबा काय म्हणती । ह्या कविता अती सुंदर असती । परी प्रेमभक्ति प्रसाद नसे त्यांत ॥ १७२ ॥ ऐकोनिया त्यांच्या वचना । राजे क्रोधें कांपती जाणा । परी साधूंचा असे बाणा । कीं सत्यवचना बोलावें ॥१७३॥ भर दरबारीं झाला अपमान । शिंद्यांनीं कैसा करावा सहन । तरी संतांसी सर्वही समान । राव रंक जाण भेद नाहीं ॥ १७४ ॥ शिंदे झाले क्रोधायमान । संतांनीं हें जाणून । त्यांसीच उद्देशून । पदत्रय रचिलें तेथंची ॥ १७५ ॥ अर्थ जाणोनी पदांचा । क्रोध गेला सर्व शिंद्यांचा । पहा परिणाम संतसंगतीचा । नम्रतेचा वास झाला अंगीं ॥१७६॥ नम्रताच असे श्रेष्ठ जगीं । तेणेंच सुख मिळेल सर्वांलागीं । प्रेमभक्ति वसे नम्रते अंगीं । संतांलागींच हें शिकावें ॥१७७॥ ऐहिक सुख हें दोन दिवसांचे । मागें लाग वें शाश्वत सुखाचें । परमार्थीं मन गुंतवावें साचें । मग कशाचेंच भय नाहीं ॥ १७८ ॥ धन संपत्तीच्या लागतां मागें । खोटेपणा करावाच लागे । जन्मभरी वासनेच्या संगें । नाचतां अंगें तृप्ति न होय ॥ १७९ ॥ कायेनें, वाचेनें सत्य सांभाळावें । सत्य हेंच ब्रह्म समजावें । दया क्षम शांतीनें अंतर शोभवावें । सर्वांत पहावें देवासी ॥ १८० ॥ चहाडी श्रवणीं घेऊन कुणाची । कर्तव्यांत चूक होईल तुमची । क्षमा न करील परमात्माची । भोगावचि लागेल आपणासी ॥१८१॥ रामनाम मुखीं असावें । अलिप्तपणें राज्य चालवावें । तो ठेविल तैसें राहावें । कौतुक करावें देवाचें ॥१८२॥ उपदेश ऐकुनी संतांचा । शिंद्यास आनंद झाला साचा । चरणांसि नमिति संतांच्या । अंतरींचा आनंद प्रगटतां ॥ १८३ ॥ असो ग्वाल्हेरींच संत झाले स्थाईक । भजनींच रत असती देख । साधूंचें पाहातां मानसिक सुख । दुःख दुर्जनांसी हेत सहज ॥१८४॥ असाच एक गृहस्थ दुर्जन । संतांसंगें बैसे प्रतिदिन । चिलीम आपुली पेटवून । मुखावरूनी त्यांच्या धूर सोडी ॥१८५॥ संत होते शांतीचे सागर । नीचावरीहि दया करणार । पद्यरूपें उपदेश सुंदर । करितां तो फार ओशाळला ॥ १८६ ॥ त्यासी निंदणें किंवा वंदणेचीं । संगती घडत संतांची । परिणाम झाला सहजची । त्याची नीच बुद्धि

पालटली ॥ १८७ ॥ शरण आला संतांसी । चरण दृढ धरोनि त्यांसि । सांगतां उद्धाराहो मजसी । माथीं वरदहस्त ठेविला ॥ १८८ ॥ असो उज्जनी हें माळव्यांतील । असे एक पवित्र स्थळ । तेथें जाती हे संत दयाळ । खळबळ नसे त्या ठायीं ॥ १८९ ॥ तेथेंच वास्तव्य करूनियां । मठ पवित्र बांधूनियां । भजन कीर्तनी रंगूनियां । भक्त ज्ञानियांसी तोषविलें ॥१९०॥ यांचें ऐकावया कीर्तन प्रवचन । येती जन प्रतिदिन । प्रेमें त्यांसी श्रवण करवून । ज्ञानामृत जाण पाजती ॥ १९१ ॥ ऐसें असतां तेच समयीं । विठ्ठलाचार्य नामें ब्राह्मण येई । धर्मशाळेंत जाऊन राही । विषयी होता तो अती ॥१९२॥ चंपा नामें स्त्रियेशीं पर । करी पाप व्यवहार । हें समजोनी संतवर, । कुविचार टाकण्या सांगती ॥ १९३ ॥ पापी वर्तन करूं नका । ऐसें विनविती संत देखा । त्या दुष्टासी त्याचा काय लेखा । क्रोध देखा आला त्यासी ॥१९४॥ संत निद्रित असतां देखोनी । उचलुनी नेले उभयतांनीं । कूपामधें लोटुनि । दिधलें दोघांनीं नाथा संतांसी ॥ १९५ ॥ रात्रींच ही कृती केली । समजती कोणा वार्ता न कळली । पुन्हा दुसऱ्या दिवशीं पाहिली । मूर्ती सांवळी नाथांची ॥ १९६ ॥ हे महा योगी संत । योगबळें वरती येत । तरी पाहोनि सोहिरोबा । विठ्ठलाचार्य खजिल झाला । दृढ धरिलें संत चरणाला । म्हणे मला क्षमा करा ॥ १९८ ॥ ऐकोनियां त्याचें वचन । उपदेशिलें त्याज लागोन । उद्धरिलें ज्ञान सांगोन । ऐसे महिमान संतांचें ॥ १९९ ॥ ज्ञानी योगी असून संत । भक्तिमार्गी जनांस लावित । साक्षात् विठूच त्यांना भेटत । आलिंगन देत भक्तासीं ॥ २०० ॥ विठूपुढें भजन केलें । भजनानंतर आलिंगन घडलें । द्वैत जाऊनि दोघे एक झाले । नाचूं लागले रुक्मिणीवर ॥ २०१ ॥ देव भावाचा भुकेला । भक्तांचाचि ध्यास त्याला । केव्हां पाहीन भक्ताला । ऐसा कळवळा माउलीला ॥ २०२ ॥ असो भक्तसंत सोहिरा । विठ्ठल मुखीं शोभला हिरा । तेणें किरिटासी साजिरा । लाजवी भास्करा स्वप्रकाशें ॥ २०३ ॥ ऐशा थोर भक्तांचें महिमान । ऐकतां पुलकित होय तनुमन । धन्य धन्य त्यांची माता जाण । नरजन्मीं येऊन संतमाता झाली ॥ २०४ ॥ किती वर्णूं संत साधूंसी । शब्दानें वर्णन होत नसेची । संतचरण दृढ धरितांची । मिळतेची शांती मनसी ॥ २०५ ॥ संतकृपा श्रेष्ठ असे जगीं । त्या विण लागूं नये अन्य मार्गी । संत कृपेनेंच पांडुरंगीं । प्रेम निजांगीं होईल ॥ २०६ ॥ असो दोन पुत्र संगेचि असती । तेच त्यांची सेवा करिती । पित्यावरी अत्यंत प्रीति । असे निश्चिती पुत्रां ॥ २०७॥ शके सतराशें चवदा चैत्रमासीं, चंडांशु येतां मध्यान्हासी । शुद्ध नवमीचे दिवशीं । अंतर्धानासि पावले ॥ २०८ ॥ शोध केला जिकडे तिकडे । परी न दिसती कुणीकडे । टाकोनी जन्ममरण सांकडे । गेले पुढें विश्वंभर ॥ २०९ ॥ संत अप्पया अदृश्य झाले । तैसेच हेही अदृश्य झाले । तेजरूप होवोनि ठेले ।

राहिले विश्रांत भरोनियां ॥ २१० ॥ परमात्मस्वरूपीं झाले रत । तेणेची म्हणती विश्वभरित । प्रेमें आळवितां प्रगट होत । संत भक्त सर्वही सदा ॥ २११ ॥ यांच्या शय्येवरी पाहातां । चिठ्ठी एक मिळाली हातां । ती सर्वांनीं वाचितां । बोध चित्ता झालासे ॥२१२॥ संत हे कुठें न गेले न आले । लीला विग्रहें संचले । परमात्म स्वरूपीं मीनले । झाले विश्वरूप देव ॥२१३॥ शके अठराशें एकूण ऐशी । विलंब नाम संवत्सराशी । शुद्धपंचमी मार्गशीर्षी । संतचरित्राशी पूर्ण केलें ॥ २१४ ॥ संत चरित्र वाचितां पावन । शांति मिळो सर्वां लागून । सद्गुरु शिवरामचरणीं प्रेमें नमन । करून आशीर्वाद मागेन ॥२१५॥ ऐसीच सेवा घडो संतांची । कृपा सर्वांवरी होवो त्यांची । आणिक आस दुजी नसेची । निरंतरची घडो संत संग ॥२१६॥ श्रोता वक्ता तोचि एक । अनेक रूपीं दिसे एक । तोचिं सद्गुरू माझा एक । हृदयस्थ एक असे जो ॥२१७॥

॥ पुंडलिक वरदा हरि विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम ॥



# कविता

आधीं शंभर वर्षं आयु अवघें; रात्रींत अर्धें सर
अर्धें त्यांतील बाल्य वृद्ध पण तें, अभ्यांत अर्धें उरे ॥
सेवा रोग वियोग दुःख मिळुनी जें शेष तें संपलें ।
पाण्याचा जणुं जीव हा बुडबुडा; त्या सौख्य हो कोठलें ॥
आहे स्वस्थचि देहरूप गृह हें, वार्धक्य राहे दुरी ।
जो हे चालति हातपाय, सरलें आयुष्य ना जों वरी ॥
आत्म श्रेयचि तों वरी मिळविण्या मोठ्या प्रयत्ना करी ।
लागे आग तदा विहीर खणणें ही रीत हो कोठली ? ॥
जाईं राहुनि वित्त भूमिंत-तशीं गोठ्यांत गाईगुरें ।
दारासीं प्रियपत्नि; आणि अवघे स्नेही स्मशानांत रे ॥
राहे देह चितेंत–मानव जधीं लोकान्तरा जातसे ।
कर्मांमागुनि एकटेच पथिं त्या जाणें कपाळीं असे ॥

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

माहे सप्टेंबर ता. १५ ते डिसेंबर ता. १४ या अवधींत मुंबई ऑफिसांत रुपये ५० व त्याहून अधिक मिळालेल्या देणग्यांची यादी खालील प्रमाणें:—

## कायम फंड

| | | |
|---|---|---|
| १. श्री एस. आर. गोरूर | | ११५०–०० |

## इमारत फंड

| | | |
|---|---|---|
| १. मे. गोल्ड सोप कंपनी | मुंबई ८ | १३२–०० |
| २. श्री. आर. व्ही. दिवेचा | जयपूर | १४८–०० |
| ३. ,, आनंदराव गणपतराव भाइंदरकर–मुंबई २८ | | १०१–०० |

## इस्पितळ फंड

| | | |
|---|---|---|
| १. श्री. आर. एस. चिटणीस | दिल्ली | १०१–०० |
| २. मे. युनिचेन लॅबोरेटरीज | मुंबई २६ | १५०–०० |
| ३. श्री. अ. सी. राजानी | वसई | ५०–०० |
| ४. मे. पटेल अँ. कं. | मुंबई २ | ५१–०० |
| ५. साईसेवक | मुंबई | १००–०० |
| ६. डॉ. मिसेस आय. बी. आडारकर | हाँगकाँग | १३४–०० |
| ( इस्पितल ३३ + कोठी रु. १०१ ) | | |
| ७. मिसेस पेरीन पी. सिघवा | मुंबई १ | ७०–०० |
| ( इस्पीताल रु. ४५ कोटी रु. २५ ) | | |
| ८. श्री. के. व्ही. मेहता | मुंबई | २००–०० |

## कोठी फंड

| | | |
|---|---|---|
| १. श्री. एम्. राजा गोपाळराव | मुंबई | १००–०० |
| २. ,, आर. अेन वकील | मुंबई ६ | ५१–०० |
| ३. श्रीमती राधाबाई के. गुप्ते | पेटलाड | ५१–०० |
| ४. श्री. सी. एन्. पंचाकशरम | चित्तुर | १००–०० |
| ५. ,, सिंघ | दार्जीलिंग | १४६–०० |
| ६. ,, जी. एम. देशपांडे | नागपूर | १०१–०० |
| ७. ,, एल. पी. पटेल | नैरोबी | १०१–५४ |
| ८. ,, के. रामचंद्रन | मद्रास २० | ६०–०० |
| ९. ,, रतिलाल भुराभाई | नैरोबी | ६६–२५ |
| १०. ,, आर. बी. पटेल | सॅलुसबरी | १५९–०० |
| ११. सौ. थोरानामबीर | मद्रास | ६७–०० |
| १२. मे. बाबू ब्रदर्स | नॉ. रोडेसीआ | ६६–२५ |
| १३. श्री. रमणलाल नाईक | नैरोबी | ५१–०० |
| १४. डॉ. मिसीस आय. एस. आडारकर | हाँगकाँग | १०१–०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | श्री. ईश्वरलाल | नंदोला | ७२–८८ |
| १६. | श्री. पं. मे मोट्टा | कोचिन | ५१–०० |
| १७. | ,, डॉ. एन. शुक्ल | राजकोट | १०१–०० |
| १८. | ,, के. सी. पटेल | दारेसलाम | ५१–०० |
| १९. | ,, आर. के. केणी | मुंबई १९ | ५१–०० |
| २०. | ,, एन. आर. व्ही. पिलय | कुवाईट | ८४–०० |
| २१. | ,, के. रामचंद्रन | मद्रास २० | ६०–०० |
| २२. | श्री. एन्. सेठना | मुंबई | ५१–०० |
| २३. | श्री. के. व्ही. मेहता | मुंबई | १००–०० |

शिरडी येथील कचेरींत आलेल्या देणग्या पुढील अंकांत देण्यांत येतील.

---

# भक्तमंडळाचे सभासद

ऑगस्ट ते डिसेंबर १९५८ पर्यंत झालेल्या आश्रयदाते व आजीव सभासदांची नांवें पुढीलप्रमाणें :—

## आश्रयदाते

१. हिज हायनेस श्री. येशवंतराव हिंदुराव घोरपडे रूलर ऑफ सांडूर
२. श्री. जशभाई हिराभाई पटेल सोरोटी ( युगांडा )
३. ,, धनंजीभाई जयरामभाई चव्हाण. मुंबई ४१
४. ,, मटाणी रामचंद्र तोलाराम ,,

## आजीव सभासद

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. यादवराव ए. बुधावंत | चरथाना |
| २. | ,, एस. जी. चेट्टी | मद्रास १ |
| ३. | ,, ब. ना. दातार | न्यू दिल्ली |
| ४. | श्री वि. य. गोहोकर | वणी |
| ५. | ,, श्री. श्री. हेम्माडी | कलकत्ता २. |
| ६. | ,, ये. व्ये. कुटुंबराव | मदाकासीरा |
| ७. | ,, माधवजी जयराम | धोंडराय |
| ८. | ,, रामराव आत्मकुरी | मसुलीपटम |
| ९. | ,, के. विश्वनाथराव | मद्रास ७. |
| १०. | ,, हि. के. आशर | मुंबई ३९. |
| ११. | ,, बा. स. बागवे | मुंबई १२. |
| १२. | श्रीमती एम्. बी. डोंगरे | पुणें २. |
| १३. | श्री. व. म. कोठारी | मुंबई १. |
| १४. | ,, शं. के. मोरे | मुंबई ९ |

१५. श्री. ज. भ. मेहता मुंबई ३९
१६. ,, द. पा. नेरकर मुंबई ४१
१७. ,, गु. आ. पंड्या मुंबई २
१८. ,, न. म. पटेल मुंबई २०
१९. ,, व्य. ना. पै मुंबई ७
२०. ,, भ. स. पराळकर मुंबई १
२१. ,, ब. कुं. शेट्टी ,,
२२. ,, चं. ना. सावंत बडोदें
२३. ,, ग. बा. वडगांवकर धुळें
२४. ,, चं. आ. वगळ मुंबई ४१
२५. द. द. नेवासकर संगमनेर
२६. ,, पी. समबीआ बेंगलोर २

## एकंदर सभासदांची संख्या
### जानेवारी ते डिसेंबर १९५८

| | | |
|---|---|---|
| आश्रयदाते | मुंबईप्रांत | २ |
| ,, | इतरप्रांत | ३ |
| आजीव सभासद | मुंबईप्रांत | ४३ |
| ,, | इतरप्रांत | २६ |
| साधारण सभासद | मुंबईप्रांत | ३६० |
| ,, | इतरप्रांत | ११८ |
| | | ५५२ |

## कुडी ही नोवरी—

* कुडी हे नोवरी आत्मा हा नोवरा । दोघें परिणूं जाती निरंतरा ॥
पांचही प्राण सर्वंही वऱ्हाडी । आशा तृष्णा दोन्हीं देशधडी ॥
शांति निवृत्ति दोघी सुवासिनी । भक्ति करवली सखी बहिणी ॥
वटेश्वर चांगा वरधवा । तुम्हीं नेऊनि मध्यें बैसवा ॥

—श्री चांगदेव

## पोट माझी माता—

● वीतभर पोट लागलेसें पाठीं । साधुसंगे गोष्टी सांगूं न देई ॥
पोट माझी माता पोट माझा पिता । पोटानें ही चिंता लाविलीसे ॥
पोट माझा बंधु पोट माझी बहीण । पोटानें हें दैन्य मांडिलेसें ॥
विष्णुदास नामा पोटाकडे पाहे । अजून किती ठाये हिंडवीसी ॥

—श्री नामदेव

# * मी कोण आहें ? *

श्रीरमणभगवानांनीं आपल्या मौनावस्थेंत अजमासें १९०१ व १९०२ सालीं श्री. शिवप्रकाशं पिले या भक्ताला जी कांहीं चिटोऱ्यावर लेखी उत्तरें दिलेली होतीं, तीं सर्व उत्तरें संवादरूपानें तामिळ भाषेंत १९२४ सालीं प्रसिद्ध झालेलीं होतीं. त्यांवरून नंतर 'नान यारू' हा तामिळ ग्रंथ व 'Who am I' नांवाचा इंग्रजी छोटा ग्रंथ १९३०।३२ सालीं प्रसिद्ध केलेला आहे. आणि रमणाश्रमानें अलीकडे हिंदी, गुजराती मराठी आणि बंगाली भाषांत 'मी कोण' याची भाषांतरें केलेलीं आहेत.

'मी कोण, कोठुनि आलों। या शरीरीं हें स्मरण धरारे॥' असा संदेश सुप्रसिद्ध साधु सोहिरोबा आंबिये यांनीं (२९१४–१७८०) यांनीं अठराव्या शतकांत दिलेला होता. तोच संदेश श्री. रमण भगवानांनीं आपल्या हयातींत अर्धे शतकांवर सर्व भक्तांना देऊन आत्मशोध करा असें अविरत कंठरवानें सांगितलें आहे. हा छोटा ग्रंथ अत्यंत अत्यंत उपयुक्त असल्यामुळें त्याचीं भाषांतरें अनेक भाषांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. या ग्रंथाचा मराठींत साररूप अनुवाद, आमचे विद्वान व साक्षात्कारी मित्र श्री. दत्तात्रेय धर्मय्या पोरेड्डी वकील क्यांप सोलापूर यांनीं प्रसिद्ध केला तो असा:—

## 'मी कोण आहे' चा साररूप अनुवाद

सुखरूप पाहिजे, नको तें दुःख म्हणुनि धडपडे सदा प्राणी।
आनंदरूप मुळचा, प्रेम स्वतांवरि असीम ते म्हणुनी ॥ १ ॥
मन लीन होय जेव्हां रोज अनुभवी सुखा सुषुप्तींत।
मी कोण हें समजणें जरूर निजानंद व्हावया प्राप्त ॥ २ ॥
मी स्थूल शरिर नोहे, ज्ञानेंद्रियें कर्मे इंद्रियें तीं हीं।
प्राणापानादिक मी नोहे, मन बुद्धि गाढ निद्रा ही ॥ ३ ॥
हें मी नव्हे न तें मी, मी केवळ सच्चिदानंद।
जोंवरि मिथ्या जगभ्रम, तोंवरि प्रगटेन 'मी निजानंद ॥ ४ ॥
आत्म्यांत एक शक्ति, मन, तेणें ये विचार अपुल्यांत।
नसतां विचार मन ही नाहीं, म्हणुनि हे विचारची चित्त ॥ ५ ॥
अत्यंत स्थूल जगत हें नाहीं, विचाराहुनी स्वतंत्र असे।
सुप्तींत जगत नाहीं, अथवा एकहि विचार तेथ नसे ॥ ६ ॥
जागृत स्वप्न अवस्थेमाजीं, जग वा विचार दिसतात।
जग उत्पत्ती स्थिति लय, यासी कारण असेच मग फक्त ॥ ७ ॥

निजरूप विसरोनी, मन पाही या जगाकडे जेव्हां ।
जग सत्य त्यास भासे, जग मिथ्या स्वरूप जाणतो तेव्हां ॥ ८ ॥
निश्चित अखंड करितां संशोधन ' काय मन ' असें म्हणूनी ।
निजरूप तेंच मन मी ' ऐसें त्याचें स्वरूप ये कळुनि ॥ ९ ॥
लिंग शरीर मी पण वा जीवात्मा म्हणती या मनालागीं
स्थूल शरीरीं मनची ' मी मी ' म्हणुनी उठे हृदयभागीं ॥१०॥
मी वृत्ती प्रथम उठे, नंतर सगळे विचार येतात ।
मी नंतर तूं मग तो, सर्वचि हे मीविणें कुठें नसतात ॥११॥
केवळ विचारगठ्ठा म्हणजे मन, शोध ' कोण मी ' करितां ।
सरती विचार सगळे, मनहि मुरे मग उरे प्रभू सत्ता ॥१२॥
येती विचार कोणा ? मजला; मी कोण ? शोध नित घेतां ।
अंतर्मुख मन होईल, त्यास कळों येई स्वरूप निज सत्ता ॥१३॥
अंतर्मुख दृष्टी हें हृदय, बहिर्मुख जिथें नसे हृदय ।
हृदयांत मन समावे, तेव्हां ये कळुनि मीं असे काय ॥१४॥
सत्य असे हृदयांतिल, तें मनरूप सत्य, तें मौन ।
याविण इतर मनाच्या शक्ती खोट्या असेंच तूं जाण ॥१५॥
आत्माच सत्य बाकी मिथ्या, आत्माच जगत, आत्मा मी ।
जितुकें म्हणुनी दिसतें, तो आत्म्याचा विकासची नामी ॥१६॥
आत्म्याचें संशोधन, मन पण जाण्यास, श्रेष्ठ साधन तें ।
मन इतर साधनानें तात्पुरते लीन, परि पुन्हां उठतें ॥१७॥
जप जाप्य, मूर्ति पूजा, सात्विक आहार, नाम जप ध्यान ।
या साधनें मनासी, येई एकाग्रता समाधान ॥१८॥
एकाग्र असें हें मन ' कोण असे मी ' विचार करूं लागे ।
आत्मविचारें मग तो पापी ही निज स्मृतींत नित जागे ॥ १९॥
संपूर्ण वासनेचा त्याग घडेतों, करि निज विचार ।
टाकुनि सर्व विचारा, निज निष्ठा एक पोस साचार ॥२०॥
आनंदरूप आपण, आपण आनंद एक, हेंच खरें ।
इतर कशापासोनी सुखप्राप्ती शुद्ध भ्रम असे पाहे ॥२१॥

इच्छातृप्तींत विरे मन, स्वरुपें भोगी मग स्वसुख तेथ ।
तैसेंच सुप्तकालीं, मूर्च्छाकालांत वा समाधींत ॥२२॥
जागृत स्वप्न अवस्था, एकाचि हे दोन फरक कालांत ।
दीर्घ असे एक दुजें अल्प, नसे भेद याहुनी त्यांत ॥२३॥
मन दोन नसे, वृत्ती दोन परीच्या मनांत परि उठती ।
बरवे वाइट यापरि दोहींचा त्याग करिति विबुध मती ॥२४॥
मीपणा उठतां सर्वचि उठते लय सर्व मीपणा जाता ।
मन स्वाधीन जयाचें निर्भय तो कोठेंही असो ताता ॥२५॥
यापरि ‘ मी कोण असें ’ रमण महर्षी कथिति आंग्ल भाषेंत ।
सारांशाने त्याचा केला अनुवाद ‘ मी स्वयं दत्त ’ ॥२६॥

—ना. वा. गुणाजी

## नामाचें साधन

पर्वतप्राय पापराशि होती दग्ध । वाचेसी मुकुंद उच्चारितां ॥
अच्युत हरे केशव हरे । माधव हरे रामकृष्ण ॥
नामाचें साधन करिशील पूर्ण । तें प्रपंचभान उरों नेदी ।
उदासीनवृत्ति आवरावें मन । नाहीं गुणधर्म मायालोभ ॥

—श्री विसोबा खेचर

## ऐसा भक्तिमार्ग धरा

नामाचिया बळें न भिऊं सर्वथा । कळिकाळाच्या माथा सोटे मारूं ॥
वैकुंठीचा देव आणूं या कीर्तनीं । विठ्ठल गाऊनी नाचों रंगीं ॥
सुखाचा सोहळा करूनि दिवाळी । प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं ॥
सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा । तेणें भक्तिद्वारा वोळंगती ॥

—श्री सांवतामाळी




## श्रीपुण्यतिथी उत्सव

यंदा श्रीपुण्यतिथी उत्सव दि.२०।१०।५८ ते २२।१०।५८ पर्यंत होता. उत्सवाबद्दल थोडासा गैरसमज यंदा निर्णयसागर पंचांगांत श्रीसाईनाथ पुण्यतिथीचा उल्लेख दि. २३।१०।५८ ला केलेला असल्यामुळें झाला; पण मागें याचा खुलासा झालेला आहे व ह्याबाबतचा निश्चित निर्णय श्रींच्या समाधीपुढें चिठ्ठ्या टाकून घेण्यांत आलेला आहे व तो निर्णय असा कीं विजयादशमी हीच् श्रीसद्गुरुरायांची पुण्यतिथि. यंदा आश्विन शुद्ध ९ लाच विजयादशमी आली होती; त्यामुळें तो दिवस म्हणजे मंगळवार दि. २१।१०।५८ हा पुण्यतिथीचा दिवस म्हणून साजरा करण्यांत आला व दुसऱ्या दिवशीं दशमी असल्यानें काला घेण्यांत आला होता. दरवर्षी विजयादशमी दशमीला असल्यानें दुसऱ्या दिवशीं एकादशी येते व त्यामुळें त्यादिवशीं काला होऊं शकत नाहीं व तो द्वादशीला घेणें भाग पडतें. ह्या सर्व कारणास्तव दरवर्षी हा उत्सव ४ दिवसांचा बहुधा होतो, तो यंदा तीनच दिवसांचा झाला.

दि. २०–१०–५८ रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त पुण्याचे श्री. मधुकरराव जोशी यांचें दुपारीं ४ ते ६ पर्यंत कीर्तन झालें. रात्रीं पालखीची गांवांतून मिरवणूक झाली व कांहीं कलाकारांनीं श्रींचे पुढें हजेरी दिली.

मंगळवार दि. २१–१०–५८ रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त, भिक्षा मिरवणुकीचा कार्यक्रम सकाळीं झाला व व सकाळीं १० ते १२ पर्यंत श्री. श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, ठाणें, विश्वस्त शिरडी संस्थान, यांचे श्रीसाईबाबांचें पुण्यतिथिनिमित्त कीर्तन झालें. कीर्तन संपल्यावर, भोजनगृहांतील तळमजल्यावरील दिवाणखान्यांत श्रींचा आराधना विधि केला गेला. हा आराधनाविधि श्री. श्री. बा., तथा बाबुराव देव, विश्वस्त व एकंदर ब्राह्मण १६ व सुवासिनी वाढावयास व जेवावयास होत्या. सायंकाळीं ५ ते ६ पर्यंत समाधिमंदिरांत मंत्रजागर झाला. रात्रौ श्रींचे रथाची मिरवणूक काढण्यांत आली व रात्रीं अनेक कलाकारांची श्रींचेपुढें हजेरी झाली.

बुधवार दि. २२–१०–५८ सकाळीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भिक्षा मिरवणूक व सकाळीं १० ते १२ पर्यंत गोपाळकाला कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला.

ह्या उत्सवांत गांवांतील व संस्थानांतील कांहीं लोकांनीं मिळून (१). अंमलदार (२) दिव्यावर झेंप व (३) डॉ. कैलास अशीं तीन सामाजिक नाटकें उत्तम रीतीनें करून दाखविलीं. यंदाचे सालीं

उत्सवाचे आदले दिवशीं म्हणजे दिनांक १९–१०–१९५८ रविवार रोजीं श्री साईभक्त संमेलन, श्रीसमाधी मंदिरा बाहेरील पटांगणांत भव्य मंडपांत साजीरें करण्यांत आलें. श्री. बाळासाहेब सावंत अध्यक्ष, [illegible]. बाजीराव पाटील, उपाध्यक्ष, श्री. भाऊसाहेब वालावलकर, बाबुराव अर्नाळकर, मुंबईचे मंत्री नामदार बाळासाहेब भारदे, संस्थानची विश्वस्त मंडळी व सभासद उपस्थित होते. श्री. बाळासाहेब भारदे यांचें भाषण झालें.

उत्सवानिमित्त संस्थान मिळकतींत विशेष स्वच्छता ठेवण्यांत आली होती.

संस्थानच्या कर्मचारी यांना पुण्यतिथि उत्सवानिमित्त रु. १०, रु. ७ व रु. ५ याप्रमाणें अधिकारपरत्वें, देणगी, कार्यकारी विश्वस्त श्री. नागेशराव सावंत श्री. हरीभाउ शेळके व श्री. शालिग्राम नागरे यांच्याहस्तें देण्यांत आली.

दर उत्सवांत नवीनच सुरू केलेले कार्यक्रम म्हणजे (२४) चोवीस तास श्रीसाईनाम संकीर्तन श्रीसाईसच्चरित्र वाचन हे चांगल्यारीतीनें द्वारकामाईत पार पडले.

## भक्तासाठीं एक नवी सोय

शिर्डी येथें येणारे भक्तांत कोणी अचानक आजारी झाल्यास दवाखान्यांतून त्यास औषध मिळण्याची सोय आहे. पण रोग्याला लागणारी उपकरणें न मिळाल्यानें रोग्याची फार कुचंबणा होते. हें लक्षांत घेऊन खालील रुग्णोपयोगी उपकरणें शिरडी येथें सर करकुनांकडे मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. तीं मोफत पण डिपॉझिट ठेऊन मिळूं शकतील.

उपकरणें—

१. थर्मामिटर
२. लघ्वीचें पात्र (पुरुषासाठीं)
३. ,, (स्त्रियांसाठीं)
४. परसाकडचे भांडे
५. गरम पाण्याची बॅग
६. आइस बॅग
७. मोसंब्याचा रस काढण्याचें पात्र




A cut above the average

With our long experience we know precisely how to appraise your individual requirements and add just that deft touch which can greatly enhance your personality.
★ A wide selection of materials in : WOOLLEN, RAYON, DACRON, SHARKSKIN, COTTON HOSIERY & QUALITY READY-MADE GARMENTS.

Consult us about your new clothes

TRUEFIT & CO.

97/103, MAHATMA GANDHI ROAD
OPP. RAJABAI TOWER, BOMBAY 1

Tel. : 253565

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | ,, | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | ,, | (हिंदी) | ,, | ,, | ४–८–० |
| (४) | ,, | (गुजराती) | ,, | ,, | ३-१२-० |
| (५) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (६) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (७) | सगुणोपासना | (मराठी) | ,, | ,, | ०–४–० |
| (८) | सगुणोपासना | (गुजराती) | ,, | ,, | ०–४–० |
| (९) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १–०–० |
| (१०) | श्रीसाई–लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (११) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ,, | ०–१–० |
| (१२) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | ,, | १–८–० |
| (१३) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (१४) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | ,, | २–०–० |
| (१५) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०–२–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील :—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट—शिरडी जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

पोस्टेज निराळें. व्ही. पी. पद्धत नाही.

---

# श्रीसाईलीलेंतील जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धें ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १५ |
| ⅛ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. १० |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धें ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |
| ⅛ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ३५ |

वि. सू.:–जाहिरात देतेवेळीं ५० टक्के आगाऊ रक्कम पाठविण्याची विनंती

श्री. वा. ह. शिंदे यांची जाहिरातीचें कॅनव्हेसिंग व बिलें वसूल करण्यास नेमणूक केली आहे